आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१० जुलै २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन संस्थगित, राज्य सरकारनं या अधिवेशनातून लोकांची निराशा केल्याची विरोधी पक्षांची टीका

- राज्यातल्या धरणांमधे ४१ पूर्णांक ११ शतांश टक्के पाणीसाठा, मुंबईला पाणीपुरवठा करणारे जलाशय ४९ टक्के भरले

- ऑस्ट्रेलियाचा दौरा आटोपून प्रधानमंत्री न्यूझीलंडला पोहोचले

- मुंबई-पुणे दरम्यान बोरघाटात दरडी कोसळल्यामुळे मध्य रेल्वेच्या ३० गाड्या येत्या १७ तारखेपर्यंत रद्द

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेंसेक्समध्ये ८२८, तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टी २४४ अंकांची वाढ

**<><><><><><><>**

विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेचा मुख्यमंत्री दे◌ेवेंद्र फडनवीस यांनी विधानसभेत उत्तर दिलं. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघातप्रकरणी सीआयडी आणि एएआयबी या दोन संस्थांकडून तपास सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिली. पवार यांच्या वैमानिकाबाबत काहीही संशयास्पद आढळलं नाही. विमानाच्या सर्व यंत्रणा तपासण्यात आल्या असून अंतिम अहवाल पुढच्या वर्षी जानेवारीत येणं अपेक्षित आहे. तो मिळाल्यानंतरच पुढच्या तपासाची दिशा ठरवता येईल असं मुख्यमंत्री म्हणाले.

महात्मा फुले शेतकरी कर्जमाफी योजनेत मिळणारी पन्नास हजार रुपयांची रक्कम आता दोन लाखांपर्यंत देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी

यावेळी केली. याशिवाय २०२५ पर्यंत असलेली कर्जमाफीची अट देखील काढून टाकण्यात आल्याचं त्यांनी जाहीर केलं. यामुळे आता अधिक शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे असं मुख्यमंत्री म्हणाले. यानंतर विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाचं काम संस्थगित करण्यात आलं.

**<><><><><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांना सरकारने दिलेल्या निधीचं सामाजिक आणि तांत्रिक लेखा परीक्षण करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधान परिषदेत केली. या लेखा परीक्षणामुळे नागरिकांना मिळणाऱ्या सोयी सुविधांची माहिती मिळेल असं ते म्हणाले. अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. विदर्भ आणि मराठवाड्यात कमी झालेला पाऊस ही चिंतेची बाब आहे. त्याचवेळी राज्याच्या अनेक भागात पावसामुळे झालेल्या दुर्घटना दुर्दैवी असल्याचं ते म्हणाले. मुंबई - पुणे महामार्गावर मिसिंग लिंकची केवळ कमान कोसळली, मिसिंग लिंक पूर्ण सुरक्षित असल्याचे त्यांनी स्पष्ट केलं. तसंच या लिंकच्या खर्चात मोठी वाढ झाल्याचा आरोप त्यांनी फेटाळून लावला आणि केवळ ७ टक्के खर्च वाढ झाल्याचं ते म्हणाले. मुंबईतल्या सिद्धीविनायक मंदिरातल्या दानपेटीतल्या भ्रष्टाचार प्रकरणी चौकशीचे आदेश न देणाऱ्या तत्कालीन सरकारवर त्यांनी टीका केली. तसंच विरोधकांनी तथ्य मांडण्याच्या ऐवजी बिनबुडाचे आरोप केले असे ते म्हणाले.

विधान परिषदेतील सतीश चव्हाण, अरुण लाड, अभिजित वंजारी, किरण सरनाईक आणि जयंत आजगावकर या सदस्यांना आज निरोप देण्यात आला. ६ डिसेंबर २०२६ पर्यंत या सदस्यांची मुदत आहे.

यानंतर विधान परिषदेचं पावसाळी अधिवेशन संस्थागित झाल्याची घोषणा सभापती राम शिंदे यांनी आज केली. हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर पासून नागपुरात होणार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><><>

राज्य सरकारनं या अधिवेशनातून लोकांची निराशा केली अशी टीका विरोधी पक्षानं अधिवेशन संपल्यावर वार्ताहर परिषदेत केली. राज्यात लोकशाही उरलेली नाही. सरकारच्या कारभारावर टीका केली तर लोकांना धमकीची भाषा वापरण्याचे प्रकार पहिल्यादांच होत असल्याचं काँग्रेस आमदार नाना पटोले म्हणाले. पाशवी बहुमताच्या जोरावर सरकार कामकाज ढकलतं आहे. पण प्रशासनावर सरकारचा वचक नाही, असा दावा त्यांनी केला. राज्यातल्या सिद्धिविनायक, शिर्डीतील साईबाबा यासारख्या अनेक देवस्थानाच्या कारभारात गैरप्रकार सुरू असल्याचा आरोप पटोले यांनी यावेळी केला.

या अधिवेशनात सरकारने नागरिकांच्या प्रश्नांना न्याय दिला नाही. घाईघाईत काही विधेयक मंजूर केली असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी केला. सरकार लाखो कोटीच्या पुरवणी मागण्या मंजूर करून घेते. पण तो निधी खर्च करत नाही. गेल्या वर्षीही दीड पावणे २ लाख कोटी रुपये खर्च केलेच नाही याकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी लक्ष वेधले.

<><><><><><>

राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे धरणांमधल्या पाणीसाठ्यात हळूहळू वाढ होत आहे. आज सकाळपर्यंत राज्यातल्या मोठ्या, मध्यम आणि लघु, अशा एकूण ३ हजार २९ धरणांमध्ये मिळून ४० हजार ८६५ पूर्णांक ३५ शतांश दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून, तो एकूण उपयुक्त साठ्याच्या ४१ पूर्णांक ११ शतांश टक्के आहे.

महसूल विभागनिहाय पाहता, कोकण विभागात सर्वाधिक ५८ पूर्णांक १८ शतांश टक्के उपयुक्त पाणीसाठा  आहे.

<><><><><><><><>

गेला आठवडाभर पडलेल्या जोरदार पावसामुळे, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांच्या जलसाठ्यात चांगली वाढ झाली आहे. सध्या एकूण उपलब्ध जलसाठा ७ लाख ३ हजार २६० दशलक्ष लिटर, म्हणजे या धरणांच्या एकूण क्षमतेच्या ४८ पूर्णांक ५९ शतांश टक्के इतका आहे. गेल्या चोवीस तासांत सुमारे १ लाख ४ हजार ६७१ दशलक्ष लिटर पाण्याची भर पडली आहे. विहार आणि तुळशी ही दोन्ही धरणं भरून वाहू लागली आहेत.

<><><><><><><><>

तीन देशांच्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज न्यूझीलंडमधे पोहोचले. न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. गेल्या ४० वर्षात प्रथमच भारताचे प्रधानमंत्री न्यूझीलंडला भेट देत असल्यानं, तिथल्या भारतीय समुदायात मोदी यांच्या आगमनाबदद्ल विशेष उत्साह होता. मोठ्या संख्येनं भारतीयांनी हातात तिरंगी झेंड्याच्या प्रतिकृती घेऊन जल्लोषात मोदी यांचं स्वागत केलं. दोन दिवसांच्या दौऱ्यात दोन्ही देशांदरम्यान व्यापार, गुंतवणूक, शिक्षण, तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रात सहकार्याबद्दल द्विपक्षीय चर्चा होणार आहे.

न्यूझीलंडला रवाना होण्यापूर्वी प्रधानमंत्री मोदी यांनी ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांच्यासमवेत आज मेलबर्न क्रिकेट मैदानाला भेट दिली. २०३० मधे राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा भारतात होणार असून, २०३६ च्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचं यजमानपद मिळवण्याचा भारताचा प्रयत्न आहे, असं यावेळी ते म्हणाले. मोदी यांनी यावेळी ऑस्ट्रेलियातले तरुण खेळाडू आणि क्रीडा क्षेत्रातल्या मान्यवरांशी संवाद साधला.

ऑस्ट्रेलियात आयोजित होणाऱ्या 'बिग बॅश लीग' क्रिकेट स्पर्धांचा एक हंगाम भारतात आयोजित केला जाईल, अशी घोषणा ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अल्बानीज यांनी यावेळी केली.

<><><><><><>

मुंबई-पुणे दरम्यान बोरघाटात दरडी कोसळल्यामुळे मध्य रेल्वेनं ३० गाड्या येत्या १७ तारखेपर्यंत रद्द केल्या आहेत. त्यात मुंबई आणि पुणे दरम्यान धावणाऱ्या डेक्कन क्वीन, डेक्कन एक्सप्रेस आणि इंटरसिटी एक्सप्रेस, तसंच सीएसएमटी-हैदराबाद एक्सप्रेस, चेन्नई एग्मोर सुपरफास्ट मेल, हुबळी-दादर एक्सप्रेस इत्यादी गाड्यांचा समावेश आहे.

६ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे कर्जत आणि लोणावळा स्थानकांदरम्यान अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या. त्यामुळे तिन्ही रेल्वे मार्गांचं मोठं नुकसान झालं आहे. दुरुस्तीचं काम युद्धपातळीवर सुरू असलं तरी, कठीण भौगोलिक परिस्थिती आणि दुरुस्ती कार्यातल्या धोकादायक स्थितीमुळे सेवा पूर्णपणे पूर्ववत व्हायला वेळ लागत असल्याचं रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><><>

भू-राजकीय तणावामुळे गेले दोन दिवस भारतीय शेअर बाजारांमध्ये सुरू असलेली पडझड थांबून आज त्यात वाढ दिसून आली. सर्वच क्षेत्रात झालेल्या समभागांच्या खरेदीमुळे शेअर बाजार वधारले. मुंबई शेअर बाजाराच्या सेंसेक्समध्ये आज दिवसअखेर ८२८ अंकांची वाढ झाली आणि तो ७७ हजार ५६९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २४४ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार २०७ अंकांवर बंद झाला.

<><><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व आठ खासदार शरद पवार यांच्यासोबत ठामपणे उभे असून, ते कुठेही जाणार नाहीत, असं माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार

पक्षाचे नेते अनिल देशमुख यांनी स्पष्ट केलं. ते आज नागपुरात झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. काँग्रेससोबत जाण्याचा कोणताही प्रस्ताव किंवा चर्चा सुरू नसल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><><><><>

हिंगोली शहर जिल्हा काँग्रेस कमिटी तसंच युवक काँग्रेसनं आज धडवाई हनुमान मंदीर परिसरात 'रघुपती राघव राजाराम' या नावानं सत्याग्रह केला. आयोध्येतल्या राम मंदिरात दान-निधीचा अपहार करणाऱ्यांचा काँग्रेसनं या सत्याग्रहाच्या माध्यमातून निषेध केला.

<><><><><><><>

एक देश एक निवडणूक पद्धतीला गोवा राज्य सरकारने पाठिंबा दिला आहे. एक देश एक निवडणूक पद्धतीवर चर्चा करण्यासाठी संयुक्त संसदीय समिती सध्या गोव्याच्या दौऱ्यावर आहे. या निर्णयामुळे सरकारला विकासावर अधिक लक्ष देता येईल आणि उत्तम प्रशासन सुनिश्चित करणं शक्य होईल, असं मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत म्हणाले.

//<><><><><><><>//